adani

# अदाणी ट्रान्समिशन (इंडिया) लिमिटेड

(पूर्वीचे नाव अदाणी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड)
''अदाणी हाऊस'' मिठाखली सिक्स रोड्स जवळ, नवरंगपुरा, अहमदाबाद-३८०००९.

## जाहीर सूचना

### विद्युत कायदा, २००३च्या कलम १८ अंतर्गत वहन परवान्यामध्ये सुधारणा करण्यासाठी केलेल्या (पूर्वी अदाणी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड हे नाव असणाऱ्या) अदाणी ट्रान्समिशन (इंडिया) लिमिटेड यांच्या अर्जावर हरकती/सूचना मागविणारी सूचना (एमईआरसी केस क्र. १३६ सन २०१४)

१. अदाणी ट्रान्समिशन (इंडिया) लिमिटेड (पूर्वी अदाणी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड हे नाव असलेल्या) यांनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्याकडे त्यांना देण्यात आलेल्या विद्युत कायदा, २००३चे कलम १४ (२००३चा ३६) आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वहन परवाना शर्ती) नियमावली २००४ यामधील २००६ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणा यांच्यानुसार त्यांना देण्यात आलेल्या 'अदाणी-पॉवर महाराष्ट्र लिमिटेड यांना वहन परवाना' (परवाना क्र.२-सन २००९) मध्ये दुरूस्ती करण्यासाठी एक अर्ज केलेला आहे.

२. संबंधित अर्जामधील तपशील पुढील प्रमाणे आहे :

**अ. वहन परवाना धारकाचे नाव :** अदाणी ट्रान्समिशन (इंडिया) लिमिटेड (अदाणी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड पूर्वी असलेले नाव)

**ब. वहन क्षेत्रामधील मुख्य कार्यालयाचा पत्ता :** अदाणी ट्रान्समिशन (इंडिया) लिमिटेड, प्लोट नं. ३९, १ला मजला, श्रीजी हाउस, कोट्वालनगर, रींग रोड, नागपूर-४४००२२, महाराष्ट्र.

**क. सन्माननीय आयोगाकडे करण्यात आलेल्या अर्जामध्ये सुचविण्यात आलेले फेरफार किंवा दुरूस्त्या यांचे वर्णन :** वहन परवान्याचे वर्तमान क्षेत्र पुढील प्रमाणे आहे :

- तिरोडा (गोंदिया) ते ४०० केव्ही वरोडा स्वीचिंग स्टेशन मध्ये स्क्वॅड कंडक्टरसह ४०० केव्ही डबल सर्किट ट्रान्समिशन लाईन.
- वरील तिरोडा प्रॉजेक्ट स्विचयार्ड येथे तिरोडा-वरोडा डबल सर्किट ट्रान्समिशन लाइन्ससाठी ४०० केव्ही बेज, संख्या २
- वरोडा स्वीचिंग स्टेशन येथे तिरोडा-वरोडा डबल सर्किट ट्रान्समिशन लाईन्ससाठी ४०० केव्ही बेज, संख्या २

**ड.** परवान्यांमधील सुधारणे नंतर वहन परवाना धारकांना संबंधित पायाभूत सुविधांसह पुढील वहन वाहिन्या सुरू करण्यासाठी व चालविण्यासाठी अधिकार मिळेल :

- तिरोडा (गोंदिया) ते ४०० केव्ही वरोडा स्विचिंग स्टेशन पर्यंत स्क्वॅड कंडक्टरसह ४०० केव्ही डबल सर्किट ट्रान्समिशन लाईन.
- वरील तिरोड प्रॉजेक्ट स्वीचयार्ड येथे तिरोडा-वरोडा डबल सर्किट ट्रान्समिशन लाईन्ससाठी ४०० केव्ही बेज, संख्या २.
- वरोडा स्विचिंग स्टेशन येथे तिरोडा-वरोडा डबल सर्किट ट्रान्समिशन लाईन्ससाठी ४०० केव्ही बेज, संख्या २.
- **तिरोडा सबस्टेशन येथे संलग्न बेससह २x८० एमव्हीएआर बस रिॲक्टर्स.**

३. **प्रस्तावित फेरफार अथवा सुधारणा यांच्या मागील कारणमीमांसा :** ४०० केव्ही डबल सर्किट तिरोडा-वरोडा या एसटीयूने आखलेल्या वहन प्रणालीचा वित्तिय वर्ष २०१०-११ ते वित्तिय वर्ष २०१४-१५च्या एसटीयू वहन योजनेमध्ये समावेश करण्यात आलेला होता. कथित प्रणालीची अंमलबजावणी करण्यासाठी अदाणी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड यांना २००९चा वहन परवाना क्रमांक २, २००९ (३० मार्च २०११ रोजी सुधारीत) ०६ जुलै २००९ रोजी मंजूर करण्यात आला होता. हा परवाना एमईआरसी केस क्र. १८९ सन २०१४ दिनांकीत ८ डिसेंबर २०१४ द्वारे अदाणी ट्रान्समिशन (इंडिया) लिमिटेड यांच्या नावे देण्यात आला आहे. वर्धा आणि वरोडा येथे अस्तित्वात असणाऱ्या तिरोडा-वरोडा लाइनच्या कार्यान्वयनाच्या वेळेस लाइन कपॅसिटन्स बरोबर जोडण्यात आलेल्या वर्धा आणि वरोडा मध्ये अस्तित्वात असणाऱ्या उच्च व्होल्टेजमुळे हा प्रभाव निर्माण झाला असून चार्जिंग तसेच कामकाज यांच्या दरम्यान बस रिॲक्टर्स बसवून त्याची भरपाई करणे भाग पडले आहे. ही बाब डब्ल्यूआरएलडीसी/एसएलडीसी यांच्याकडील विविध तांत्रिक अहवाल, पत्रव्यवहार यांच्यामध्ये अधोरेखित करण्यात आलेली होती आणि याशिवाय ही बाब सन २०१३ची केस क्र. ५१ आणि सन २०१३ची केस क्र. १९० वरील आयोगाच्या आदेशामध्ये नमूद करण्यात आलेली होती. त्याअनुसार बस रिॲक्टर्स हे (पूर्वी एपीएमएलच्या परवाना देण्यात आलेल्या) एटीएलच्या वहन प्रणालीचा एक अंगभूत भाग म्हणून विचारात घेणे गरजेचे आहे.

४. सदर अर्ज आणि इतर दस्तऐवज कोणाही व्यक्तिला पाहता यावेत यासाठी वेबसाइट www.adanipower.com वर उपलब्ध आहेत. सदर अर्ज आणि इतर दस्तेएवज यांची कामकाजाच्या कोणत्याही दिवशी सकाळी १० ते संध्याकाळी ५ यादरम्यान कामाच्या वेळेस पुढील व्यक्तिंच्या कार्यालयामध्ये पहाणी करता येऊ शकेल :

(१) **श्री. जिग्नेश लंगालिया,** अदाणी ट्रान्समिशन (इंडिया) लिमिटेड, ३रा मजला, अचलराज बिल्डींग, महापौर बंगल्याच्या समोर, लॉ गार्डन, अहमदाबाद-३८०००६

(२) **श्री. अजित बरोडिया,** ६०१, हॉलमार्क बिझिनेस प्लाझा, संत ज्ञानेश्वर मार्ग, कलामंदिर टॉकिज जवळ, गुरू नानक हॉस्पिटलसमोर, वांद्रे (पूर्व) मुंबई-४०००५१

५. अर्जासाठी ₹१०/- (रुपये दहा फक्त) आणि इतर दस्तऐवजांसह अर्जासाठी ₹१००/- (रुपये शंभर फक्त)चा भरणा केल्यास वरील व्यक्तिकडून अर्ज आणि इतर दस्तऐवज यांची प्रत्यक्ष जाऊन खरेदी करता येऊ शकेल. याशिवाय अर्जासाठी ₹३०/- (रुपये तीस फक्त) आणि इतर दस्तऐवजांसह अर्जासाठी ₹१३०/- (रुपये एकशे तीस फक्त) एवढ्या रकमेच्या ''अदाणी ट्रान्समिशन (इंडिया) लिमिटेड'' यांच्या नावे काढलेल्या अहमदाबाद येथे देय असलेल्या डिमांड ड्राफ्टसह श्री. जिग्नेश लंगालिया, ३रा मजला, अचलराज बिल्डींग, महापौर बंगल्यासमोर, लॉ गार्डन, अहमदाबाद-३८०००६ यांच्याकडे विनंती केल्यास टपालाद्वारे देखील अर्ज व इतर दस्तऐवज यांची खरेदी करता येऊ शकेल.

येथे नमूद केलेला अर्ज व दस्तऐवज यांची प्रत ज्या वेबसाईटवरून विनामूल्य डाऊनलोड करता येऊ शकेल ती वेबसाइट : **www.adanipower.com**

६. आयोगाकडे करण्यात आलेल्या अर्जाच्या संदर्भात हरकत घेऊ इच्छिणारी कोणतीही व्यक्ती ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी पोहचेल अशाप्रकारे अर्जदारांकडे एक प्रत पाठवून **सेक्रेटरी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर क्र. १, १३वा मजला, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४००००५** यांच्या नावे लिखित सूचना (६ प्रतींमध्ये) पाठवून तसे करू शकतात.

अधिकृत सहीकर्ता
सही व हुद्दा/-
अदाणी ट्रान्समिशन (इंडिया) लिमिटेड

स्थळ : मुंबई
तारीख : १६ जानेवारी, २०१५